राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- ५३७६ / २०२३/ कोल्हापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| विश्वनाथ खंडू अंबपकर | ग्रामसेवक, मौजे संभाजीपूर ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | गटविकास अधिकारी, पंचायत समिती शिरोळ, जि.कोल्हापूर |

**( सुनावणी दिनांक - १८/०६ /२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.१३.०८.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हजर आहेत. उत्तरवादी ऑनलाईन हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि.०७.०६.२०२३ च्या माहिती अर्जात मौजे संभाजीपूर येथील सरपंचाच्या सहीच्या अधिकाराबाबत १ ते ३ मुद्यांची माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, "माझी सही घेतली परंतु मला माहिती दिली नाही."

आज रोजी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, "अपिलार्थीला प्रथम अपिल सुनावणी नंतर माहिती दिली आहे."

उपलब्ध अभिलेखावरून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीला माहिती दिलेचे दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, मौजे संभाजीपूर ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र "अ" मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतूदीनूसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ५३७६ / २०२३ / कोल्हापूर 9146/2025 दिनांक - 2/9/2025